महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : १३

# महाराजा सयाजीराव
# आणि
# योगी अरविंद घोष

डॉ. राजेंद्र मगर



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : १३

# महाराजा सयाजीराव
# आणि
# योगी अरविंद घोष

डॉ. राजेंद्र मगर

महाराजा सयाजीराव आणि
योगी अरविंद घोष
इतिहास
डॉ. राजेंद्र मगर
●
प्रकाशन क्रमांक - ३३
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : डॉ. राजेंद्र मगर
संशोधन सहायक,
महाराजा सयाजीराव गायकवाड
चरित्र साधने प्रकाशन समिती,
महाराष्ट्र शासन, औरंगाबाद
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : २३ रुपये

---

- मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
  संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
- या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
  कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
- **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/
  101507596(1) - 14-02-2019**
- **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/
  1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**

●●●



# महाराजा सयाजीराव
# आणि
# योगी अरविंद घोष

श्री. ऑरोबिंदो ऊर्फ (श्री. अरविंद) योगी अरविंद घोष हे विसाव्या शतकातील एक महान क्रांतिकारी व युगप्रवर्तक तत्त्वज्ञ आणि महायोगी होते. ते स्वातंत्र्यसेनानी, शिक्षणतज्ज्ञ आणि महाकवी या विविध भूमिकांनी ओळखले जातात.

अरविंदांचा जन्म १५ ऑगस्ट १८७२ रोजी पश्चिम बंगालमधील कलकत्ता या ठिकाणी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव डॉ. कृष्णधन घोष आणि आईचे नाव सुवर्णलतादेवी होते. अरविंदांचे वडील कट्टर 'आंग्ल' वृत्तीचे होते. त्यांचे वैद्यकीय शिक्षण इंग्लंडमध्ये झाल्याने कदाचित त्यांच्या मनावर 'आंग्ल' वृत्तीचा पगडा बसला असावा. म्हणून पुढे त्यांनी आपल्या अरविंदासहित इतर पुत्रांना दार्जिलिंग येथील लोरेंटो विद्यापीठात शिक्षणासाठी पाठवले; पण तेथील शिक्षणपद्धतीवर त्यांचे समाधान झाले नाही. म्हणून अरविंद सात वर्षांचे असतानाच त्यांच्या वडिलांनी शिक्षणासाठी इंग्लंडला पाठवले. तेथे विल्यम ड्रेवेट दांपत्याकडे शिक्षणासाठी ठेवले. काही काळ त्यांच्या मार्गदर्शनाखाली

शिक्षण घेतल्यावर सेंट पॉल शाळेत घालण्यात आले. यावेळी डॉ. कृष्णधन घोष यांनी या मुलांची भारतीय लोकांशी किंवा भारतातील घडामोडींशी परिचय होऊ नये म्हणून सक्त सूचना ड्रेवेट दांपत्याला दिल्या होत्या. येथील शिक्षण पूर्ण झाल्यावर अरविंदांनी वयाच्या सतराव्या वर्षी सीनिअर स्कॉलरशिप संपादन करत केंब्रिज येथील किंग्ज कॉलेजमध्ये प्रवेश मिळवला. याकाळात त्यांनी इंग्रजी भाषेबरोबर फ्रेंच भाषा, वाङ्मय आणि युरोपच्या इतिहासाचे अध्ययन केले. त्यांनी इटालियन आणि जर्मन भाषाही अवगत करून घेतल्या.

वडिलांच्या सांगण्यावरून अरविंद आय.सी.एस. परीक्षेस बसले. या परीक्षेत यशस्वीही झाले. इथपर्यंत सर्वकाही व्यवस्थित होते; परंतु शेवटची घोड्यावर बसण्याची चाचणी त्यांनी दिली नाही. आणि आपण या सेवेसाठी पात्र असलो तरी ही गुलामीची नोकरी करू इच्छित नसल्याचे त्यांनी दाखवून दिले. या अगोदर शिक्षण काळात भारतीय लोक, इंग्रजांच्या अधिपत्याखालील गुलामगिरी आणि इंग्रजांची मुजोरी याबद्दल त्यांच्या मनात चीड निर्माण झाली होती. यामुळेच हातात प्रतिष्ठित नोकरी असतानासुद्धा त्यांनी ती नाकारली. राष्ट्रप्रेमातून त्यांनी क्रांतिकारी संघटना स्थापन केल्या. त्यामध्ये अनेकांना सक्रिय केले.

अशातच त्यांची भेट स्वाभिमानी आणि राष्ट्रप्रेमी महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्याशी झाली. त्यांना या महान नृपतीचे दर्शन घडताच इंग्रजांच्या गुलामगिरीपेक्षा बडोदे सरकारची

नोकरी त्यांनी स्वीकारली. त्यांना सयाजीराव महाराजांसारख्या देशप्रेमी, सुधारक आणि पुरोगामी राजाच्या व्यक्तिमत्त्वाविषयी आकर्षण वाटत होते. ज्या दिवशी अरविंद घोष यांची मुलखात झाली त्यादिवसापासून सयाजीराव महाराजांनी त्यांना पगार सुरू केला. कदाचित हा अनमोल हिरा आपल्याकडून दुसरीकडे जाऊ नये हेही धोरण महाराजांचे असू शकते.

## अरविंद घोष यांची बडोद्यातील नोकरी

अरविंद परदेशातून ८ फेब्रुवारी १८९३ रोजी बडोद्यात आले. पण त्याकाळात त्यांच्या योग्यतेचे एकही पद रिक्त नव्हते. म्हणून महाराजांनी त्यांना नेहमीच वरिष्ठ दर्जाच्या कामात व्यस्त ठेवले. काही काळ स्वीय सल्लागार म्हणून काम दिले तर काही काळ इतर महत्त्वाच्या कामात त्यांना गुंतवून ठेवले. बडोदा राज्यात अरविंद घोष काय काम करतात याला अजिबात महत्त्व नव्हते; तर ते फक्त बडोद्यात असण्याला खूप महत्त्व होते. म्हणून महाराजांनी त्यांना सुरुवातीच्या काळात इतर महत्त्वाच्या अधिकाऱ्यांबरोबर दोनशे रुपये वेतन ठेवले. बडोद्यात रुजू झाल्यावर सर्वप्रथम त्यांना कचेरीत सेटलमेंट डिपार्टमेंटमध्ये काम देण्यात आले. पुढे काही काळानंतर स्टँप आणि रिव्हेन्यू विभागात बदली करण्यात आली. सुरुवातीच्या काळात त्यांनी ठराविक अशा एका विभागात जास्त दिवस काम केले नाही. कारण त्यांना शिक्षण क्षेत्राबद्दल जसे आकर्षण होते तसे सरकारी, कचेरी कामाची अजिबात आवड नव्हती. बालपणापासून त्यांच्या मनावर प्रामाणिकपणा आणि

कर्तव्यनिष्ठा यांचे संस्कार होते, त्यामुळे त्यांनी ज्या विभागात आपली नेमणूक होईल तेथील कामे अत्यंत चोखपणे पार पाडली.

## बडोदा कॉलेजमधील अध्यापनाचे काम

अरविंद घोष यांची अनेक मानाच्या पदावर नेमणूक केली तरी त्यांचा ओढा हा शिक्षण क्षेत्राकडे अधिक होता. म्हणून बडोदा कॉलेजमध्ये फ्रेंच भाषेच्या अर्धवेळ प्राध्यापकाची जागा रिक्त झाल्याबरोबर त्याठिकाणी त्यांची नियुक्ती करण्यात आली. फ्रेंच भाषेत इंग्लंडमधील अध्ययन काळातच ते पारंगत असल्याने त्यांना ही जागा सन्मानपूर्वक देण्यात आली. जरी ही जागा अर्धवेळ प्राध्यापकाची असली तरी त्यांना इतरही कामे पूर्वीप्रमाणेच करावी लागत होती. त्यामध्ये अनेक वेळा महाराजांबरोबर नानाविध गंभीर आणि इतर विषयांवर चर्चा करणे, त्यांना योग्य मार्गदर्शन आणि सल्ला देणे, अशा गोपनीय कामांचा समावेश होता.

पुढे बडोदा कॉलेजमध्ये इंग्रजी विषयाची जागा इ.स. १९०० मध्ये रिक्त झाली. महाराजांनी तत्काळ त्या जागेवर त्यांची नियुक्ती केली. अध्यापन हा आवडीचा विषय असल्याने अरविंद घोष आपल्या ज्ञान आणि प्रतिभेमुळे विद्यार्थ्यांमध्ये अल्पावधीतच लोकप्रिय झाले. अरविंद घोष आपल्याला शिकवायला द्यावेत म्हणून अनेकदा विद्यार्थ्यांनी शिफारसपत्रे प्राचार्यांकडे दिली. याबाबतची एक आठवण बडोद्यात ३८

वर्षे नोकरी केलेल्या रियासतकार गो.स. सरदेसाई यांच्या ‘सयाजीराव गायकवाड यांच्या सहवासात’ या पुस्तकात दिली आहे. ‘अरविंदबाबू बडोदा कॉलेजमध्ये प्रोफेसर होते. ते इंग्रजी कविता शिकवू लागले की सर्व विद्यार्थी त्यांचा प्रशांत भाषणऔघ ऐकून सर्वथा गुंग बनत.’ इ.स. १९०४ मध्ये बडोदा कॉलेजमध्ये उपप्राचार्यपद रिक्त झाल्याने त्या जागेवर त्यांची नियुक्ती करण्यात आली. तर पुढे काही वर्षांनी प्राचार्य म्हणूनही त्यांनी पदभार सांभाळला.

## सयाजीराव महाराजांना भाषणात मदत

अरविंद घोष हे तीक्ष्ण बुद्धीचे, इंग्रजी विषयात पारंगत असणारे प्राध्यापक होते. इंग्रजांच्या कुटिल नीतीचा त्यांना अभ्यास होता. त्यामुळे सयाजीराव महाराजांना महत्त्वाच्या ठिकाणी ज्यावेळी भाषण करण्याचा प्रसंग येई त्यावेळी महाराजांनी तयार केलेली भाषणाची स्क्रिप्ट वाचून पाहणे, त्यात बदल सुचवणे, इंग्रजांचा रोष महाराजांवर येऊ नये म्हणून वाक्यात बदल करणे किंवा तोच मुद्दा सौम्य भाषेत सांगण्यासाठी वाक्यरचना बदलणे अशा प्रकारचे अनेक बदल, दुरुस्ती किंवा इतर महत्त्वपूर्ण माहिती समाविष्ट करणे अशी कामे महाराज अरविंद घोष यांच्याकडे सोपवत असत. सरदेसाई याबद्दलची एक आठवण सांगतात, ‘एकदा सामाजिक परिषदेपुढे महाराजांस भाषण करावयाचे होते. ते अरविंद घोषांनी तयार करून आणले. आम्ही तिघांनी बसून ते वाचले. त्यावर महाराज बोलले, हे भाषण इतके उच्च

प्रकारचे उतरले आहे की, लोकांना ते माझे असे वाटणार नाही. म्हणून ते जरा कमी दर्जावर आणले पाहिजे. "Can you not, Aravindbabu tone it down? It is too fine to appear to be mine" त्यावर किंचित हसून अरविंद म्हणाले, मुद्दाम कशाला ती फिरवाफिरव करा! महाराज तुम्हाला असे वाटते की, थोडे गचाळ केले म्हणजे ते तुमचेच आहे असे लोक मानतील? चांगले असो, वाईट असो, लोक नेहमीच म्हणणार की महाराज आपली भाषणे दुसऱ्यांकडून लिहवून वाचतात. विचार तुमचेच आहेत ना! तोच तुमचा मुख्य अंश." महाराजांनी सभेत ते भाषण पुढे वाचले. तेव्हा त्यांची फार वाहवा झाली.' अरविंद घोष महाराजांच्या अगदी अंतर्गत वर्तुळात वावरत होते; परंतु महाराजांपुढे त्यांनी कधी हार मानली नाही. जे योग्य आहे त्याला योग्य म्हणण्याची ताकद आणि परिपक्वता त्यांनी कमावली होती. म्हणूनच महाराज त्यांचा सल्ला मानत असत.

## बडोद्यातील वास्तव्यात स्वातंत्र्यलढ्यात सहभाग

महाराज परदेशात गेले, की त्यांच्या पश्चात बडोद्यातील रेसिडेंट काहीतरी प्रकरण उकरून काढून त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न करत असत. असेच एकदा महाराज परदेशात असताना त्यांचे गुरू एफ.ए.एच. इलियट प्रमुख असलेल्या बारखळी खात्याचे एक प्रकरण बाहेर काढण्यात आले. यामधील इलियट यांच्या हाताखालील अधिकारी वासुदेव सदाशिव बापट लोकांकडून लाच घेतात आणि इतरही काही आरोप त्यांच्यावर करण्यात

आले. हे सर्व आरोप महाराजांना बदनाम करण्यासाठीच होते. या बापटांना त्यांची बाजू मांडू न देता पदावरून कमी करण्यात आले. यामध्ये बडोद्याचे तत्कालीन दिवाणांचाही हात होता. महाराजांना त्यांचे मित्र खासेराव जाधव यांनी पत्राद्वारे या सर्व बाबी अवगत केल्या होत्या. महाराज मायदेशी परत येताच त्यांनी इ.स. १८९५ मध्ये पुन्हा ही केस अभ्यासासाठी हाती घेतली. याविषयावर महाराजांनी अरविंद घोष यांची मदत घेतली. त्यावर पुन्हा अभ्यास केला आणि बापटांना निर्दोष ठरवत इंग्रज अधिकाऱ्यांनी रचलेले कुभांड नामेनिराळे करून टाकले. यामधील सर्व बाबी महाराजांनी इतक्या शांतपणे हाताळल्या की, कोणत्याही इंग्रज अधिकाऱ्यांची पुन्हा या विषयावर बोलण्याची हिंमत झाली नाही.

फक्त प्राध्यापक म्हणून अरविंद घोष बडोद्यात आले नव्हते; तर सयाजीराव महाराजांच्या आश्रयाखाली स्वातंत्र्यचळवळीतील एक मोठा गट कार्यरत होता, यामध्ये सहभाग घेऊन इंग्रजांना शह देणे हे महत्त्वाचे कार्य त्यांना पार पाडायचे होते. त्यांनी इंदुप्रकाश वृत्तपत्रातून 'जुन्या ऐवजी नवे दीप' (न्यू लँप्स फॉर ओल्ड) या लेखमालेतून इंग्रजांच्या दडपशाहीचे वाभाडे काढण्यास सुरुवात केली. त्यांच्या तेजस्वी वाणीने आणि धारधार लेखणीने बडोद्यातील अनेक तरुण स्वातंत्र्यलढ्याकडे आकर्षिले गेले. ही लेखमाला जवळजवळ सहा महिने सुरू होती. अरविंद घोष अनेकदा बडोद्याहून सुटी घेऊन कलकत्ता येथे जात. त्या ठिकाणी

सुरू केलेल्या ‘वंदेमातरम’ या लेखातूनही खळबळजनक लेख लिहीत. अरविंद घोष यांना एवढे दिवस सुटी कशी काय मिळते याबाबत इंग्रज अधिकारी महाराजांकडे विचारणा करत; परंतु महाराज ही बाब माझ्या अखत्यारीत येत नाही हे सांगून मोकळे होत. थोडक्यात, काय तर महाराजांचा अरविंद घोषांना पूर्ण पाठिंबा होता. मागे म्हटल्याप्रमाणे त्यांचे बडोद्यातील वास्तव्याच अनेक अर्थाने महान होते. त्यामुळे बडोदा राज्यात त्यांना विशेष सवलती मिळत होत्या.

अरविंद घोष यांनी बडोदा राज्यातील मेहसाणा या ठिकाणी असणाऱ्या ‘शिक्षक’ छापखान्यातून काही लेखांचे भाषांतर केल्याचा संशय इंग्रजांना होता. तसेच ‘मुक्ती कोन पथे’ या पुस्तकाचे गुजरातीत भाषांतर केल्याचाही आरोप त्यांच्यावर होता; परंतु सयाजीराव महाराजांच्या गनिमीकाव्याने हे आरोप इंग्रजांना सिद्ध करता आले नाहीत. महाराजांचा अरविंद घोष यांना पूर्ण पाठिंबा आणि राजाश्रय होता. त्यामुळे इंग्रजांच्या कोणत्याही आरोपाला महाराज परस्पर उत्तर देऊन प्रकरण मिटवत असत.

अरविंद घोषांना प्राथमिक शिक्षणापासूनच व्यायामाची आवड होती. इंग्लंडमध्ये असताना देखील ते नियमितपणे व्यायाम करत होते. क्रांतिकारी संघटनामधून कार्य करायचे म्हणजे शरीर आणि मन सदृढ पाहिजे असे त्यांचे मत होते. बडोद्यात आल्यावर सुद्धा त्यांनी व्यायामाला फाटा दिला नाही. स्वतःही नियमितपणे

व्यायाम करत असत. त्याचबरोबर बडोद्यातील प्रजेलाही व्यायामाचे महत्त्व पटावे म्हणून अंबुभाई आणि छोटुभाई पुराणी या व्यायाम क्षेत्रातील मान्यवरांच्या मदतीने बाजवाडा परिसरात लक्ष्मीनाथ व्यायामशाळा सुरू केली. अरविंद घोष या व्यायामशाळेला नियमित भेट देत.

प्रो. माणिकराव यांचा बडोद्यातील जुम्मादादा आखाडाही क्रांतिकारी संघटनांचे आश्रयस्थान होते. या आखाड्यामध्ये प्रो. माणिकराव, खासेराव जाधव, माधवराव जाधव, केशवराव देशपांडे आणि अरविंद घोष यांच्या काही गोपनीय बैठका झाल्याच्या नोंदी सापडतात. याही आखाड्याला अरविंद घोष वारंवार भेट देत होते.

अरविंद घोष बडोद्यात असतानाच त्यांनी क्रांतिकारक संघटना स्थापन केल्या तसेच अनेक क्रांतिकारी संघटनांशी त्यांचा घनिष्ठ संबंध होता. जतीन बॅनर्जी या बंगाली सैनिकाला बडोद्यात गोपनीय रीतीने बोलावून त्यांनी बडोदा लष्कराचे प्रशिक्षण दिले होते. त्यांना विशिष्ट कार्यक्रम व योजना देऊन पुन्हा बंगालमध्ये धाडले होते. अनेक क्रांतिकारी संघटनांमध्ये त्यांनी बडोद्यात असतानाच सुसंवाद निर्माण केला होता. याच काळात त्यांनी शिक्षणासाठी ‘भवानी मंदिर’ नावाची भव्यदिव्य योजना उभारण्याचे ठरवले होते. ही योजना इंग्रजांच्या करड्या नजरेतून न सुटल्याने पूर्णत्वास गेली नाही.

## अरविंद घोष यांचे बडोद्यातील मित्र

अरविंद घोष बडोद्यास येताच पूर्वीचे मित्र केशवराव देशपांडे यांचीही भेट झाली. केशवराव देशपांडे बडोद्यास नोकरीस आले. त्यांचा राष्ट्रीय चळवळीकडे जास्त ओढा होता. त्यामुळे क्रांतिकारक खासेराव जाधव, केशवराव देशपांडे, प्रो. माणिकराव, माधवराव जाधव आणि रियासतकार सरदेसाई यांची मैत्री अल्पावधीतच झाली. यामध्ये साहित्यिक संपतराव गायकवाड यांचाही नेहमी वावर असे. साहित्य, क्रांतिकारक, देशाचे स्वातंत्र्य यावर त्यांच्या नेहमीच चर्चा होत. त्यांच्या निकट सहवासाचा अनुभव त्याकाळात अनेक नामांकित साहित्यिकांनी घेतला. यामध्ये रियासतकार सरदेसाई, खासेराव जाधव, माधवराव जाधव, राजरत्न प्रो. माणिकराव यांचा समावेश होता.

## बडोद्यातील वास्तव्य

बडोद्यात अरविंद घोष यांचे वास्तव्य १३ वर्ष होते. याकाळात त्यांनी सहा-सात ठिकाणी राहत होते. प्रथम बापूसाहेब मुजुमदार यांच्याकडे राहत होते. त्यानंतर काही काळ फतेगंज कॅप गायकवाड चाळीत राहत होते. पुढे मीर बाकर अलींचा वाडा (रावपुरा), किल्लेदार वाडा (मकरपुरा) रेसकोर्स येथील एक घर, शेवटी दांडिया बाजार मधील एक बंगला त्यांना आवडला आणि शेवटपर्यंत ते तेथेच राहिले. पुढे हा बंगला अरविंदाश्रम म्हणून राष्ट्रीय स्मारक झाले. आजही हा बंगला अरविंदाश्रम म्हणून ओळखला जातो.

## साहित्य निर्मितीचे बीजारोपण

अरविंद घोष यांचा मूळ पिंडच क्रांतिकारी आणि साहित्यिक होता. वर उल्लेख केल्याप्रमाणे अरविंद घोष आणि बडोद्यातील साहित्यिक यांच्या वारंवार चर्चा होत. आज देशाला कोणत्या साहित्याची नितांत आवश्यकता आहे याची त्यांना कल्पना होती. त्यामुळे बडोदा दरबारात दाखल झाल्यावर (८ फेब्रुवारी १८९३) अरविंदांनी चार महिन्यांतच 'इंदुप्रकाश'मधून धारधार लेखमाला लिहिली. पुढे त्यांनी बंकिमचंद्र यांच्यावरील लेखमाला लिहिली. त्यांनी बंगाली, मराठी व गुजराथी भाषांचा अभ्यास केला. त्यांनी पुढे 'सावित्री' नावाचे जे महाकाव्य निर्माण केले त्याची पायाभरणी बडोद्यात झाली होती. चोवीस हजार पद्यपंक्तीत विस्तारलेले व आकारमानाने मिल्टनच्या विश्वविख्यात महाकाव्याच्या दुप्पट असणारे विशाल, रसाळ व प्रासादिक काव्य पुढे वेदपुरीस (पांडेचरी) पूर्ण केले.

## बडोद्याला निरोप

इंग्लंडमध्ये असल्यापासून अरविंद घोष यांना राष्ट्रीय चळवळीविषयी आकर्षण वाटत होते. पुढे हिंदुस्थानात आल्यावर त्याकडे त्यांचा अधिकच ओढा वाढला. त्यांनी काही काळ बडोद्यात राहून हे कार्य करण्याचे ठरवले. परंतु त्याचा त्रास त्यांच्यापेक्षा नृपती सयाजीराव महाराजांना जास्त होऊ लागला.

पुढे बंगालची फाळणी आणि राष्ट्रीय सभेचा स्वातंत्र्याकडे वाढलेला ओढा पाहून त्यांचे मन बडोद्यात जास्त काळ रमेना. त्यांना आपल्या मातृभूमीची आठवण जास्तच येऊ लागली. बडोदा सोडण्याचा त्यांनी निर्णय घेतला. त्यांनी वर्षभर बिनपगारी रजा टाकून कलकत्ता येथील राष्ट्रीय महाविद्यालयात काम सुरू केले. ते पुन्हा परत येतील असे बडोदेकरांना वाटत होते. परंतु राष्ट्रीय सभा आणि क्रांतिकारकांशी वाढलेला संपर्क यामुळे त्यांचे बडोद्यात येणे अनिश्चित झाले. त्यामुळे समस्त बडोदेकर चिंताग्रस्त बनले.

इ.स. १९०७ मधील गाजलेले सुरत अधिवेशन संपवून अरविंद घोष बडोद्यास परतले. याच कालावधीत त्यांची महायोगी लेले यांच्याशी गाठ पडली. त्यांनी या योगीमहाराजांना आपले आध्यात्मिक गुरू मानले. ज्या बडोद्याला त्यांनी कर्मभूमीला मानले त्याच भूमीत चांदोदच्या कर्नाळी या क्षेत्री गंगानाथला त्यांना आध्यात्मिक अनुभूती प्राप्त झाली. तत्पूर्वी त्यांनी मुजुमदारांच्या वाड्यात तीन दिवस आध्यात्मिक अनुभूतीचा सुखानुभव घेतला होता. आपले यापुढील जीवन आध्यात्मिक अनुभूतीसाठी घालवण्याचे ठरवले. क्रांतिकारक अरविंद घोष महायोगी अरविंद झाले. त्यांनी जानेवारी १९०९ मध्ये बडोदा सोडण्याचा निर्णय घेतला. महाराजांनी स्वत: मित्रमंडळी आणि

बडोद्यातील लोकांनी त्यांनी बडोदा सोडू नये म्हणून प्रयत्न केले; परंतु कोणालाही यश मिळाले नाही. त्यांच्या निर्णयावर ते ठाम होते. यावेळी त्यांना बडोद्यातून आपल्या मातृभूमीकडे घेऊन जाण्यासाठी त्यांचे बंधूही आले होते.

महायोगी अरविंद घोष यांना निरोप देण्यासाठी महाराजांनी मोठ-मोठ्या कार्यक्रमांचे नियोजन केले. या निरोपाच्या दिवशी बडोद्यातील वातावरण अतिशय दुःखमय बनले होते. ११ जानेवारी १९०९ रोजी ज्यावेळी योगी अरविंद कलकत्त्याकडे जाण्यास निघाले त्यावेळी समस्त बडोदेकरांच्या डोळ्यातून अश्रूंचा धारा वाहत होत्या. अरविंद घोष यांचे बडोद्यातील वास्तव्य सर्वार्थाने श्रेष्ठ होते. त्यांनी १३ वर्षे बडोद्यात वास्तव्य केल्यानंतर सयाजीनगरीचा निरोप घेतला.

●●●

# संदर्भ

१. सरदेसाई गो.स., श्री. सयाजीराव गायकवाड यांचे सहवासांत, एस. जगन्नाथ आणि कंपनी, पुणे, १९५६.

२. भोळे भा.ल., आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर, ति.आ. २०१६.

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर
- दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव
- डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर
- सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई
- दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव
गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील
- शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह
- देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद
- डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा
- राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती
- निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर
- सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक
कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण
परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा
- राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि
जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम
राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव ‘प्रजासत्ताक’
राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि
सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि
शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि
जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



**❒ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**मराठी :**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**English**

- Spechess & Adresses : 2 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- World Tour Reports : 3 Books
- Biographies : 5 Books
- Letters : 4 Books
- Administration : 1 Books
- Education Reforms : 3 Books
- Total English Books : 20

**हिन्दी :**

- सयाजीराव का लेखन : १
- सयाजीराव जीवनी : २
- पत्र संग्रह : ३
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- भाषण संग्रह : २
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
  कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाची महाराजा सयाजीरावांची वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com